# कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी - ४१३४०१

Email -ID-am_barshi@msamb.com फोन - ०२१८४-२२२१७६

## जाहीर प्रसिध्दीकरण

कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी व दुय्यम कार्यालय, वैराग या कार्यक्षेत्रात अनुज्ञप्ती (परवाना) धारक सर्व अडत्या, व्यापारी, प्रक्रिया करणारे, दलाल, हमाल, तोलार, वटवणी अभिकर्ता, वखारवाला यांना यान्वये कळविणेत येते की, त्यांचे अनुज्ञप्ती (परवाना) ची मुदत दिनांक ३१/०३/२०२५ रोजी संपत आहे.

तरी ज्यांना दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या वर्षाकरिता अनुज्ञप्तीचे नूतनीकरण करुन घ्यावयाचे आहे. त्यांनी दिनांक २८/०२/२०२५ पूर्वी बाजार समितीकडे अनुज्ञप्ती फी व इतर आवश्यक त्या पूर्ततेसह नूतनीकरण करण्यासाठी अर्ज करावेत. सदर मुदतीनंतर अर्ज केल्यास अडत्या, व्यापारी, प्रक्रिया करणारे, दलाल, हमाल, तोलार, वटवणी अभीकर्ता, वखारवाला यांना अनुज्ञप्ती फी च्या १०% इतकी रक्कम दररोज विलंब आकार (लेट फी) व फॉर्मविलंब फी १ रुपया इतकी रक्कम भरावी लागेल. तसेच अडत्या/व्यापारी अनुज्ञप्तीधारकाने मागील वर्षाच्या उलाढालीचा पुरावा सोबत जोडणे व ईनाम योजना अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे. व हमाल/तोलार कामगारांनी त्यांच्या मागील वर्षे केलेल्या कामाचा पुरावा सोबत जोडणे आवश्यक आहे.

अनुज्ञप्ती नूतनीकरण करतेवेळी बाजार फी, प्लॉट भाडे, गाळा मोबदला, म्यु.कर, दुकान भाडे, मार्केट फी, इतर फी भरण्याची पुर्तता करावी. अन्यथा अनुज्ञप्ती (परवाना) नूतनीकरण केले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

अनुज्ञप्ती संबंधिची आवश्यक ती माहिती अर्जाचा नमुना (फॉर्मस) बाजार समितीच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील.

सही/-
**श्री. तुकाराम अंबादास जगदाळे**
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी

सही/-
**श्री. विजय विठ्ठल राऊत**
मुख्यप्रशासक
कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी